विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूनेमधील दिनांक ४ मे , २०१६ व दिनांक, ११ जुलै, २०१६ रोजी केलेली अनुक्रमे तिसरी व चौथी सुधारणा राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे व अकृषि विद्यापीठांशी संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१७/ प्र. क्र. ३३/१७/विशि-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०४ मार्च, २०१७

**<u>वाचा</u>**

१) शासन निर्णय क्रमांकः एनजीसी-२००९ (२४३/०९) /विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९
२) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-३.१/२००९, दिनांक ३० जून, २०१०
३) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०११/(२५/११)/ विशि-१, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११
४) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-१-२/२००९, (EC/PS), दिनांक १३ जून, २०१३
५) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/ प्र. क्र. ८८/१६/विशि-१, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६
६) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F.१-२/२०१६ (PS Amendment), दिनांक ४ मे, २०१६.
७) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F.१-२/२०१६ (PS Amendment), दिनांक ११ जुलै, २०१६.
८) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F.१-२/२०१६ (PS) Amendments, दिनांक १० जानेवारी, २०१७.

**प्रस्तावना :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भ क्र. २ येथील दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व महाविद्यालये / संस्था मधील शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या, सदर पदांची किमान शैक्षणिक अर्हता, इ. निश्चित केलेल्या आहेत. तसेच सदर पदांवरील अध्यापकांच्या वेतनश्रेण्या, अनुषंगिक लाभ, वेतनवाढी, इत्यादी बाबत आदेश दिलेले आहेत. सदर अधिसूचना संदर्भ क्र. ३ येथील दिनांक १५ फेब्रवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्यात आली आहे. संदर्भाक़ित क्र. ४ येथील दिनांक १३ जून, २०१३ च्या अधिसूचनेन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेत केलेली दुसरी दुरूस्ती संदर्भाकित क्र. ५ येथील दिनांक १५

ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भ क्रमांक ६ व ७ येथील अधिसूचनेन्वये दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये केलेल्या (तिसरी व चौथी) सुधारणा राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

१. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये संदर्भाधीन क्र. ६ व संदर्भाधीन क्र. ७ येथील अनुक्रमे दिनांक ४ मे, २०१६ व दिनांक ११ जुलै, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये केलेल्या अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या सुधारणेतील शिफारशी / निर्देश याबाबत साकल्याने विचार करून त्यासंदर्भात शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| अ.क्र. | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० मधील परिच्छेद क्र. | शासन आदेश |
|---|---|---|
| १ | परिच्छेद क्र. ३.३.१, ४.४.१, ४.४.२.१, ४.४.२.२, ४.४.२.३, ४.५.३ व ४.६.३ | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ६ येथील दिनांक ४ मे, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| २ | परिच्छेद क्र. ३.४.१, ५.१.६ (d), ६.०.५ (i) | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ७ येथील दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये सुधारित केल्याप्रमाणे तंरतुदी जशाच्या तशा लागू करण्यात येंत आहेत. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ८ येथील दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदी लागू राहतील. |

३. तसेच संदर्भाधीन क्र. ७ येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ११ जुलै, २०१६ च्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र. ३, ४, ५ व ६ मधील तरतुदी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३०४१३१८३१२५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vijay Eknath Sable
Date: 2017.03.04 13:20:45 +05'30'

(विजय साबळे)
शासनाचे अवर सचिव

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
Estd:1962
NAAC 'A'Grade
MHRD-NIRF-28th Rank
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर-४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीबीएक्स) २६०९००० फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : www.affiliationt1@unishivaji.ac.in

शिवाजी वि./संलग्नता टी.१/ प्रशांत/No 1056 दिनांक 15 MAY 2017

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यावाहीसाठी अग्रेषित

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर